PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2019-20)/ 09 / of 2019**

## परिपत्रक:

**विषय:— "आपत्त्ती व्यवस्थापन आराखडा" बंधनकारक असल्याबाबत.**

**संदर्भ:— परीक्षा विभागाची क्र. ईक्य/आयसीडी/२०१८—१९/१९१७ दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीची टिप्पणी.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजी मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दिक्षांत समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने "आपत्त्ती व्यवस्थापन समिती" नेमण्यात आली होती. त्या समितीकडून दिक्षांत "समारंभासाठी" व्यवस्थापन आराखडा देखील तयार करण्यात आला आहे व समितीने सादर केलेल्या अहवालास मा. कुलगुरूंची मान्यता घेण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार अशी कायम स्वरूपी यंत्रणा असणे आवश्यक आहे. या अधिनियम कलम ३० मधील (२७) अन्वये प्रत्येक संस्थेचा "आपत्त्ती व्यवस्थापन आराखडा" असणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने आपणांस विनंती करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांनी आपल्या महाविद्यालयात लवकरात लवकर **आपत्त्ती व्यवस्थापन समिती व आराखडे** तयार करावेत.

मुंबई—४०० ०३२<br>
०७ जून, २०१९

(डॉ अजय देशमुख)<br>
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.